दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १२० वा बुधवार दि.१६ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## दिवाळीपुर्वी लातूर शहर स्वच्छ सुंदर बनवावे सर्व विकास योजनांची कामे दर्जेदार करावेत

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क विकासाचा सर्वकक्ष अराखडा तयार करावा









लातुर / प्रतिनिधी :- लातूर शहरातील कचरा व्यवस्थापनासाठी नवीन एजन्सी आली आहे. दिवाळीपुर्वी संपूर्ण शहर स्वच्छ, सुंदर करावे, नव्याने मंजूर झालेल्या सर्व योजनांची कामे दर्जेदार पध्दतीने वेळेत पूर्ण करावीत शहर वाहतुकीला शिस्त लावावी, सीटी बसमधील महीलांसाठी मोफत बस प्रवास योजना सुरुच ठेवावी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर सर्वकक्ष विकास अराखडा तयार करुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळयाची उभारणी करावी आदी सुचना, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज सांयकाळी लातूर शहर महानगरपालीका आढावा बैठकी दरम्यान दिले आहेत.

सोमवारी सांयकाळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहर महानगरपालीका कार्यालयात जाऊन शहरातील विविध विकास योजनांच्या संदर्भाने आढावा बैठक घेतली. मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे सर्व विभाग प्रमुख व क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते.

मागच्या काळात लातूर शहरातील कचरा व्यवस्थापना बाबत अनेक तक्रारी होत्या आता नव्या एजन्सिला हे काम दिले असून ठिकठिकाणी साचलेला कचरा उचलण्याचे काम सुरू झाले आहे. शहरातील सव्वा लाख घरावर क्युआर कोड स्कॅनर बसवीले असून या व्दारे घंटागाडीची नियमतता तपासली जाणार आहे. कालच या सुवीधेचा शुभारंभ माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केला आहे. कचरा व्यवस्थापन अत्यंत प्रभावी आणि पारदर्शक पध्दतीने करण्यात यावे असे निर्देश या बैठकी दरम्यान त्यांनी दिले.

शहरात लवकरच ५० नवीन इलेक्ट्रिक सीटीबस दाखल होत आहेत. त्याचे व्यवस्थीत वेळापत्रक तयार करावे. जवळपासच्या गावात ही सुवीधा सुरू करावी. महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यात महीलांना मोफत सीटीबस योजना चालू करण्या बाबत आश्वासन देण्यात येणार आहे. त्यामुळे लातूर शहरात महीलांसाठीची मोफत सीटीबस योजना पूढे सुरूच ठेवावी. शहरातील वाहतूक व्यवस्थेला शिस्त लावावी. फेरीवाला धोरणाचा नव्याने आढावा घेऊन त्यांची ताबडतोब अंमलबजावणी करावी. शहरात चार दिवसाला नियमीत स्वच्छ पाणीपुरवठा करावा. पटेल चौकातील विलासराव देशमुख शासकीय वैदयकीय महाविदयालयाच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या १८९ खाटाच्या रुग्णालयाच्या उभारणीसाठी जागे बाबत त्वरीत कार्यवाही करावी, नव्याने शहरात मंजूर केलेल्या विकासयोजना दर्जेदार पध्दतीने वेळेत पूर्ण कराव्यात, निवडणूक कालवधी असला तरी विकासकामे सुरूच ठेवावीत. मांजरा धरणावरुन येणाऱ्या संमात्तर पाईपलाईनचे व भुमिगत गटार योजनेचे काम लवकरात लवकर सुरू करावे, लिंगायत, गोसावी, वैदू समाजासाठी स्मशानभुमीचा प्रश्न तात्काळ निकाली काढावा आदी सुचना यावेळी देण्यात आल्या.

शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पार्कवर उभा राहवयाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळा उभारणी संदर्भात सदयस्थितीची माहीती घेऊन संपूर्ण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पार्कचा सर्वकक्ष विकास अराखडा तयार करण्याच्या सुचना आमदार देयामुख यांनी दिल्या. या परीसरात असलेले हुतात्मा स्मारक, महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुतळा, व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, संविधान स्तंभ, ग्रंथालय, उदयान या सर्व गोष्टीचा या अराखडायात समावेश करावा या मैदानावर पून्हा पाणी साचणार नाही यांचेही नियोजन करावे, चांगल्या वास्तुवीशारदकडून हा अराखडा बनवून घ्यावा आदी सुचना यावेळी आमदार देशमुख यांनी दिल्या आहेत.

या बैठकी दरम्यान मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी शहरात राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाची माहीत दिली. याप्रसंगी लातूर मनपात नव्याने रुजू झालेल्या अधिकारी व पदोन्नती मिळालेले सहाय्यक आयुक्त शेख खदीर, विजय राजुरे, नंदकिशोर तापडिया यांचा आमदार देशमुख यांच्या हस्ते सत्कार करुन त्यांचे स्वागत करण्यात आले.

## आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत जवळगा येथील असंख्य तरुण भाजपात

लातूर :- रेणापूर तालुक्यातील मौजे जवळगा (सेलू) येथील काँग्रेस विचाराच्या असंख्य तरुणांनी भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आज मंगळवारी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. तरुणांच्या या प्रवेशाने जवळगा गावात काँग्रेसला मोठा झटका बसला आहे.




भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील गावागावात वाडी वस्तीत विकासाच्या विविध योजना मोठ्या प्रमाणात राबवण्यात आल्या. विविध योजनेला हवा तेवढा निधी त्यांनी मिळून दिला. आ. कराड यांच्या प्रयत्नामुळे होत असलेल्या विविध विकास कामाना प्रभावित होऊन अनेक गावातील अनेक जण भाजपा जाहीर प्रवेश करीत आहेत. लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात मंगळवारी दुपारी रेणापूर तालुक्यातील मौजे जवळगा येथील असंख्य तरुणांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत भाजपा जाहीर प्रवेश केला. प्रवेश केलेल्या सर्व तरुणांचे स्वागत करून ज्या विश्वासाने भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला त्या विश्वासाला कदापी तडा जाणार नाही असे सांगून येणाऱ्या निवडणुकीत सर्वांनी जिद्दीने जोमाने काम करून भाजपाचे मताधिक्य वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत असे आ कराड यांनी बोलून दाखविले.

यावेळी लातूर ग्रामीण मतदार संघाचे संघटन विस्तारक नंदकिशोर राणा, भाजपाचे पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, सांगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, जिल्हा परिषद माजी सदस्य सुरेंद्र गोडभरले, शरद दरेकर जवळगा येथील भाजपाचे रवींद्र पाटील, निवृत्ती चिद्रे, जलील शेख, नारायण राठोड, मनोज पाटील, संजय जाधव, चंद्रकांत पाटील, रणजीत पाटील, चंद्रकांत नायने, बळीराम जाधव, वीरभद्र किटेकर, बाबू साठे, रंगनाथ टमके, जोतीराम कांबळे, किसनाथ वाघे, महादेव नामने यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत जवळगा येथील शुभम पाटील, मंगेश जाधव, प्रशांत जाधव, मल्हारी वाघे, लक्ष्मण भोयने, हनुमंत भोयने, दत्ता जाधव, अविनाश पाटील, सचिन सुनापे, बाळू सुनापे, नागेश वाघे, प्रवीण कांबळे, रणजीत करणवाड, तुकाराम टमके, अभिजीत कोडे, दत्ता बनसोडे, अविनाश कांबळे, रवी कांबळे, चैतन्य खटाळ, नागेश कंदरफळे, समाधान कांबळे, जनार्दन खटाळ, रामेश्वर जाधव, प्रवीण जाधव, नागेश वाघे, नवनाथ वाघे, अमर पाटील, मेनीनाथ चव्हाण, वैष्णव जाधव, लक्ष्मण केळे, गोविंद केळे, ज्ञानेश्वर दत्तनुरे, लक्ष्मण लांबोटे, संतोष खताळ, गोपाळ चिद्रे, नामदेव खटाळ, सौरभ कांबळे, बिभीषण कांबळे, शंकर राठोड, माऊली साठे, राम नायने, समाधान टमके, बिबीशन बनसोडे, चंद्रकांत पाटील, रणजीत पाटील, वैभव जाधव, बंडू वाघे, बालाजी वाघे, शंकर वाघे, अंगद वाघे, विजय पाटील, प्रीतम क्षीरसागर, आत्माराम रोंगे, विशाल नायने, नामदेव जाधव, यांच्यासह इतर अनेक जणांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला.

## तलाठी व कोतवाल यांना आता नवीन नावाची ओळख;ब्रिटिशकालीन पदनामात शिंदे सरकारने केला बदल

मुंबई/प्रतिनिधी :- तलाठी व कोतवाल यांना आता नवीन नावाची ओळख;ब्रिटिशकालीन पदनामात शिंदे सरकारने बदल केला आहे त्यामुळे कर्मचाऱ्यामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की दिनांक१४ ऑक्टोंबर२०२४ रोजी तलाठ्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम १४, ७६, १४९, १५०, १५१, १५३, १५४ या कलमात नमूद केलेली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. जिल्हाधिकारी यांनी नमूद केलेली नोंदणीपत्रके, रजिस्टरे व जमाखर्च लिहिण्याचे काम तलाठ्याकडे असते. जमीन महसूल व जमीन महसूल थकबाकी म्हणून सर्व रकमा त्यांना गोळा कराव्या लागत आहेत. कोणत्याही वरिष्ठ महसूल अधिकारी किंवा पोलीस सांगेल ते गावासंबंधी लिहिण्याचे काम तलाठयास करावे लागते. महसूल विभागातील तलाठी संवर्गाच्या पदनामात बदल करून ग्राम महसूल अधिकारी असे पदनाम करण्याची विनंती महाराष्ट्र राज्य तलाठी संघ यांच्याद्वारे करण्यात आली होती. महसूल विभागातील तलाठी संवर्गाच्या पदनामात बदल करून ग्राम महसूल अधिकारी असे पदनाम करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. मंत्रिमंडळाच्या झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत महसूल विभागातील तलाठी (गट-क) संवर्गाच्या पदनामात बदल करून ग्राम महसूल अधिकारी असे पदनाम करण्यास पुढील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली आहे. तसेच कोतवाल पदाचेही पदनामात बदल करून कोतवालांना चतुर्थ श्रेणी लागू करणे व इतर मागण्यांच्या संदर्भात मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी बैठक झाली होती. त्या बैठकीत कोतवाल हे पद ब्रिटिश काळापासून अस्तित्वात असल्याने या पदनामात बदल करून त्याऐवजी महसूल सेवक करण्याची मागणी मान्य करण्यात आली आहे. तसेच




वरीलप्रमाणे पदनाम बदलामुळे भविष्यात वेतनश्रेणी वाढी संदर्भात प्राप्त होणारी कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही,तसेच पदनाम बदलानंतर वेतनश्रेणी/ वेतनस्तर देण्याच्या अनुषंगाने भविष्यात वेतनत्रुटी समितीपुढे मागणी करता येणार नाही व अशी मागणी विचारात घेतली जाणार नाही,

सातव्या वेतन आयोगानुसार तलाठी या पदाची वेतनश्रेणी एस ८, रू.२५५००-८११००/- अशी आहे. तलाठी या पदनामामध्ये बदल केल्यामुळे या वेतनस्तरामध्ये अथवा वेतनश्रेणीमध्ये बदल करण्याची वा वेगळयाने वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी विचारात घेतली जाणार नाही,

वरीलप्रमाणे पदनाम बदलानंतर सध्याच्या गट-क संवर्गामध्ये कोणताही बदल होणार नाही, गट बदला संदर्भातील कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही, तसेच कोतवाल यांचे महसूल सेवक असे पदनाम बदलामुळे भविष्यात शासकीय कर्मचाऱ्यांनुसार वेतन श्रेणी लागू करण्याची कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही, असेही शासनाने जाहीर केलेले आहे.

## भुमीगत गटारामुळे उदगीर शहर स्वच्छ व सुंदर शहर होण्यास मदत - क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

### उदगीर शहरातील रोगराई नष्ट होणार

उदगीर/ प्रतिनिधी :- मतदार संघाचा मास्टर प्लॉन तयार करुन गेल्या ५ वर्षात नागरिकांना मुलभुत गरजा पुरविल्या असुन मतदार संघाचा चौफेर विकास करुन महाराष्ट्रात उदगीरचा एक विकासाचा 'नवा पॅटर्न' निर्माण केला असुन शहरातील सर्व इमारती अद्यावत सुविधेसह पुर्णत्वाकडे जात आहेत. रस्ते, वीज, पाणी, आरोग्याच्या सुविधा, सर्व समाज घटकांना न्याय दिला. नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण होवु नये व उदगीर शहर स्वच्छ व सुंदर दिसावे आणि शहरातील सर्व नालीचे पाणी शहराच्या बाहेर काढण्यासाठी राज्य शासनाच्या नगर विकास विभागातुन नगरोत्थान महाभियानांतर्गत उदगीर शहरातील (भुमीगत गटार) मलनि:स्सारण प्रकल्पास ३६० कोटी रुपयाचा निधी मंजूर केला असुन पहिल्या टप्प्यात एकुण १६१ कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे त्या पहिल्या टप्प्यातील वरकींग सर्व्हेच्या कामाला आज सुरुवात झाली असून या भुमिगत गटारामुळे उदगीर शहर स्वच्छ व सुंदर शहर होण्यास मदत होणार असल्याचे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.





ते उदगीर शहरातील भुयारी गटार योजने अंतर्गत सर्व्हेच्या (टप्पा - १) कामाच्या भुमिपुजन सोहळ्या प्रसंगी बोलत होते.

यावेळी मुख्याधिकारी सुंदर बोंदर, माजी नगरसेवक अनिल मुदाळे, सय्यद जानीमियाँ, बाळासाहेब पाटोदे, जितेंद्र शिंदे, जयंती सुपर कन्ट्रक्शन कंपनीचे मेहसाना गुजरात, प्रोजेक्ट इंन्चार्ज जस्मिन गोयाणी, प्रकल्प व्यावस्थापण सल्लागार सतिश राठोड, ऋषीकेश बंडगर, राऊत, पाणी पुरवठा अभियंता एस.एस. कटके, अविनाश गायकवाड, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान कार्यक्रमांतर्गत उदगीर शहर भुयारी गटार योजना टप्पा - १ या योजनेच्या कामाला सुरुवात झाली असून उदगीर शहरातील नालीचे पाणी शहराच्या बाहेर काढण्यात येणार असून आता या भुमीगत गटारामुळे उदगीर शहरातील रोगराई कमी होवून आपण निरोगी आयुष्य जगणार आहात. शहरातील नागरीकांना मूलभूत गरजा पुरवुन आरोग्य, रस्ते, वीज, पाणी आदी सुविधा पुरविला असल्याचे ना.संजय बनसोडे यांनी सांगितले. यावेळी उदगीर शहरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# दशमीचा दुभंगानंद!

आजच्या महाराष्ट्रासमोरची सर्वात गंभीर समस्या कोणती? अर्थव्यवस्थेची स्थिती आणि वाढती कर्जे, कायदा-सुव्यवस्थेचा अभाव, अन्य राज्यांकडून वाढती स्पर्धा, खेळासकट अन्य अनेक क्षेत्रांत होणारी महाराष्ट्राची पीछेहाट, शहरांचे बकालीकरण हे सर्व वा आणखी काही मुद्दे समस्या ठरत नाहीत; असे नाही. या समस्या आहेतच. पण या सर्व समस्यांचे मूळ आहे ते महाराष्ट्राचे अत्यंत वेगाने होणारे अंतर्गत विलगीकरण. या राज्याचे झपाट्याने होत चाललेले कप्पे. हे कप्पे आर्थिक तर आहेतच. पण आर्थिक कप्पे कायम असतातच आणि काही अंशी असणारच. पण आजच्या महाराष्ट्रासमोरचे खरे आव्हान आहे ते वाढता सामाजिक दुभंग; हे. कसे; ते समजून घेणे आवश्यक आहे. या दुभंग विश्लेषणाचे वरवरचे लक्षण म्हणजे विजयादशमीच्या मुहूर्तावर वाढू लागलेले विविध मेळावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ साली नागपुरात १४ ऑक्टोबरला बौद्ध धर्म स्वीकारला. त्या दिवशी विजयादशमी होती. ते सर्वार्थी सीमोल्लंघन होते. त्यामुळे विजयादशमीदिनी नागपूरच्या दीक्षाभूमीवर त्यांचे हजारो अनुयायी या सीमोल्लंघनाच्या स्मरणार्थ जमतात. त्याच्या आधी सुमारे चार दशके याच दिवशी डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्यामुळे विजयादशमीस संघ समर्थक रेशीमबागेत वर्धापन दिन साजरा करतात. हे दोन्ही नागपुरात एकमेकांपासून हाकेच्या अंतरावर. विजयादशमीदिनी या दोन मेळाव्यांची ऐतिहासिक परंपरा महाराष्ट्राला आहे. यावर्षी सरसंघचालक मोहनराव भागवत यांनी आपल्या भाषणातून 'रेशीमबाग' ते 'दीक्षाभूमी' हे अंतर कमी करायचा प्रयत्न केला. 'दलित म्हणावा आपुला' हा त्यांच्या भाषणाचा सारांश. संघ विचाराने चालणाऱ्या भाजपची ती सध्याची राजकीय निकड होतीच. ती पूर्ण झाली. ते ठीक. याखेरीज साठच्या दशकापासून महाराष्ट्रात लक्षणीय ठरत गेला तो शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा मुंबईत शिवाजी पार्कात भरणारा विजयादशमी मेळा. 'विचारांचे सोने लुटण्यासाठी' सेना नेते, कार्यकर्ते शिवाजी पार्क मैदानात ऊर्फ शिवतीर्थावर या दिवशी जमत. त्यातील वैचारिक मौक्तिकांच्या मूल्याबाबत मतभेद असू शकतात. बाकी काही मिळो वा न मिळो, शिवसेनाप्रमुखांच्या भाषणांतून दोन गोष्टी अवश्य मिळत. मनोरंजन आणि शिवसेनेच्या पुढील वाटचालीबाबतची दिशा. हा पक्ष आगामी काळात कोणत्या दिशेने जाऊ इच्छितो याचा काही प्रमाणात अंदाज या मेळाव्यातून मिळत असे. दोन वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे याच्या पक्षत्यागाने या एका मेळाव्याचे दोन मेळावे झाले. शिवसेनेस पाठिंबा देणाऱ्या मराठी माणसाचा दुभंग दोन मेळाव्यांतून अधोरेखित झाला. त्यात न्यायालय तसेच निवडणूक आयोगादी यंत्रणांचे सौजन्य आणि सत्ताधारी भाजपची गरज यांमुळे अधिकृत शिवसेनेचा दर्जा शिंदे यांच्या सेनेस मिळाला. त्यामुळे त्यांचा मेळावादेखील सेनेचा अधिकृत मेळावा ठरला. शिंदे यांच्याआधी बाळासाहेबांचे पुतणे राज यांनी शिवसेनेकडे पाठ फिरवून स्वत:ची सेना स्थापन केली. बाळासाहेबांच्या उद्धव शिवसेनेची विजयादशमी म्हणून मग राज यांच्या सेनेचा गुढीपाडवा अशी ही विभागणी. यावर्षी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने राज यांनी विजयादशमीदेखील आभासी वास्तवात पाळली. तेवढेच सीमोल्लंघन! विजयादशमीस विदर्भात रा. स्व. संघ, बौद्ध मेळावे, मुंबईत बाळासाहेब ठाकरे सेना आणि एकनाथ शिंदे-चलित सेना यांचे मेळावे असताना मराठवाड्यातही अशी मेळावे परंपरा झाली. विदर्भ आणि मुंबई या ठिकाणच्या प्रत्येकी दोन मेळाव्यांस ज्याप्रमाणे एक सामाजिक किनार आहे त्याचप्रमाणे मराठवाड्यातील या नव्या मेळाव्यांसही एक सामाजिक चेहरा आहे. गोपीनाथ मुंडे हे भाजपचे एक ज्येष्ठ नेते. 'सोशल इंजिनीअरिंग' हा शब्दही जेव्हा जन्माला आलेला नव्हता तेव्हा संघातील वसंतराव भागवत यांच्या मुशीतून घडलेले मुंडे हे राज्यातील सर्वात प्रबळ 'ओबीसी' चेहरा होते. त्यांच्या निधनाने भाजपपेक्षाही अधिक नुकसान 'ओबीसी' समाजाचे झाले. मुंडे आणि दुसरे प्रबळ 'ओबीसी' नेते छगन भुजबळ यांच्यात एक 'सामाजिक' सख्य होते. पक्ष भिन्न. पण समाजाच्या बंधाने हे दोन्हीही नेते बांधलेले होते आणि शक्यता ही की मुंडे हयात असते तर या उभयतांची एक आघाडी जन्मास येती. मुंडे गेले आणि ते राहिले. त्यात त्यांचा पुतण्या धनंजय यानेही काका हयात असतानाच त्यांचा हात सोडला आणि कन्या पंकजा यांना भाजपत फटके बसल्यानंतर वडिलांच्या सामाजिक वारशाची आठवण झाली. 'सांगे वडिलांची कीर्ती' त्यांस नव्या भाजपत पुरेशी ठरली नाही. तेव्हा त्यांनी वडिलांच्या सामाजिक वारशास हात घातला आणि स्वत:चा वेगळा विजयादशमी मेळा भरवणे सुरू केले. अन्य कोणत्याही अशा मेळाव्यांप्रमाणे शक्तिप्रदर्शन हाच त्याच्या मेळाव्याचाही हेतू होता. त्यात गैर काही नाही. तथापि त्यांच्या यंदाच्या मेळाव्यास ताज्या लोकसभा निवडणुकीतील पराभवाच्या भळभळत्या जखमेची पार्श्वभूमी होती. हा पराभव अन्य कोणत्याही पराजयाप्रमाणे सरळ नव्हता. त्यास सामाजिक किनार होती. 'ओबीसी' गोपीनाथरावांनी आपल्या हयातीत मराठा कार्ड उत्तम जोपासले. त्याचमुळे शेजारील मतदारसंघातील काँग्रेसी मराठा विलासराव देशमुख आणि भाजपीय 'ओबीसी' मुंडे हे परस्परपूरक साथीदार होते. गेल्या चार वर्षांतील मराठा आंदोलनामुळे हा बंध सुटला आणि तुटलेल्या मराठा समाजाने पंकजा मुंडे यांस दणदणीत हरवले. त्यात गेली दोन वर्षे गरीब आणि सत्तासमीकरणाबाहेरच्या मराठा समाजास मनोज जरांगे यांच्या रूपाने एक नवे आणि आक्रमक नेतृत्व मिळालेले आहे. राज्यात विद्यमान युती सत्तारूढ होईपर्यंत संपूर्ण जालना जिल्ह्यासही ठाऊक नसलेले जरांगे हे मराठ्यांचा एकदम राज्यस्तरीय चेहरा कसे बनले याच्या सुरस कथा चर्चिण्याचे हे स्थळ नव्हे.

# १६ आक्टोंबर विश्व खाद्य दिवस

प्रति, माननीय संपादकजी.

विषय:-खाद्यपुर्तीसाठी अन्नाचा एक -एक-कण वाचविण्याची गरज.

विश्व खाद्य दिवस कृतीत बदलायला पाहिजे तेव्हाच जगातील उपासमारी संपुष्टात येईल.खाद्यांन्नाची समस्या पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने १६ आक्टोंबर १९४५ ला खाद्य व कृषि संघटन ( एफएओ ) ची स्थापणा केली.कॉफ्रेस ऑफ द फूड एंड एग्रीकल्चर ऑर्गनाइजेश(एफएओ) ने १६ आक्टोंबर १९७९ पासून विश्व खाद्य दिवससाजरा करण्याची घोषणा केली.तेव्हापासुन जगात आंतरराष्ट्रीय विश्व खाद्य दिवस साजरा केल्या जातो.या दिवसांचा उद्देश म्हणजे जगातील वाढती भुकमरीची(उपासमारी) समस्यांच्या प्रती लोकांना जागरूक करने.उपासमारी, कुपोषण व गरीबीच्या विरूद्ध संघर्षाला मजबुती प्रदान करने.उपासमारीच्या समस्येकरीता संपूर्ण जग संघर्ष करीत आहे व उपासमारी, कुपोषण यातुन बाहेर निघण्यासाठी सर्वांचा संघर्ष सुरू आहे. भारताची अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करीत आहे. परंतु आजही कोट्यवधी भारतीयांची भूक भागत नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.तर भारताचे एक चीत्र असेही आहे की गोडाऊनमध्ये करोडोंटन अन्न-धान्य सडत आहे.विश्व खाद्य दिवस साजरा करण्याचा उद्देश म्हणजे जगातील उपासमारी (भुकमरी) संपुष्टात आणणे.परंतु जगाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की,या कार्यक्रमाच्या इतके वर्षांनंतरही सुध्दा आजही जगातील करोडो लोकांना आम्ही दोन वेळचे जेवण सुध्दा देवु शकत नाही हे जगाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.अन्न हे पुर्ण ब्रम्ह म्हटल्या जाते.कारण अन्नाशिवाय कोणीही जगु शकत नाही. मानव, जीवजंतू वन्यप्राणी जंगल संपदा यांना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी अन्नाची आवश्यकता असते. त्यामुळे अन्नाच्या नासाडीबाबत जागरूकता आवश्यक आहे. अन्न-धान्य पिकवीण्याकरीता पाण्याची आवश्यकता असते. त्याचबरोर सजीव व निर्जीव या दोन्ही घटकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असते.त्यामुळे अन्नाची संपूर्ण प्रक्रिया पाण्यावर अवलंबून असते. अन्न-धान्याला जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षा जास्त महत्व पाण्यालासुध्दा आहे.कारण पाणी रहाले तरच अन्नाचे उत्पादन होवु शकते.१६ आक्टोंबर संपूर्ण जग विश्र्व खाद्य दिवसम्हणुन साजरा करतात.कारण खाद्दांनाची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. आज जगातील प्रत्येक व्यक्ती रोजगार मीळवीण्यासाठी का?धावपळ करतो?, मोल-मजुर, कामगारांना काम मिळावे म्हणून का धावपळ करतो? यामागे एकच उद्देश असतो वितभर पोटाची खळगी भरणे कारण काहीना काम मिळाले नाही तर उपाशीपोटी राहावे लागते हे सुद्धा अर्धसत्य आहे याला नाकारता येत नाही. करोणा काळात जगातील अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या ओढावली होती.कारण या काळात करोडो लोकांचा रोजगार हिरावल्या गेला होता.त्यामुळे भारतासह अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या दिसून आली.या उपासमारीच्या संकटात अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागले.अशाप्रकारचे उग्ररूप करोणा काळात दीसुन आले.जगात खाद्यांन्नाला कुठेही तडा जाऊ नये याकरिता शेतकरी वर्ग आपल्या अंगातुन घाम गाळतो व शेती पिकवितो. तेव्हाच देशासह जगातील लोकांच्या पोटाची खळगी भरते. म्हणुनच शेतकऱ्यांना अन्नदाता म्हणुन संबोधल्या जाते. शेतकऱ्यांनी जर अन्न पिकवीले नाही तर संपूर्ण जनतेवर उपाशी मरण्याची पाळी येवु शकते.परंतु मानवजातीला जिवीत ठेवण्याचे दायीत्व व जबाबदारी शेतकऱ्यांनी घेतली आहे. त्यामुळे सर्वप्रथम १६ आक्टोंबर विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने संपूर्ण शेतकरी बांधवांना मी शतशत प्रणाम करतो. कारण उन, पाऊस,थंडी,ओला दुष्काळ,कोरडा दुष्काळ, सुनामी आणि अकाल यांच्याशी संघर्ष करून शेतकरी शेतीतुन उत्पन्न काढत असतो.भारताला शेतकऱ्यांचा राजा संबोधल्या जाते म्हणजेच कृषिप्रधान देशपरंतु गेल्या ७७ वर्षांपासून आजही भारतीय शेतकरी दु:खी असल्याचे दिसून येते.कारण आजही शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला सरकार कडून योग्य भाव मिळत नाही.सरकारकडुन बाजार समिती किंवा मंडीमध्ये योग्य भावाची घोषणा केली जात नाही.त्यामुळे भारतीय शेतकरी नाराज असल्याचे दिसून येते.आज शेतकऱ्यांचा विचार केला तर मनाने व स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून करोडपती आहे. परंतु आर्थिकदृष्ट्या कंगाल आहे. कारण भारतात शेतकऱ्यांचे रक्त पिण्याचे काम दलाल,व्यापारी व राजकीय पुढारी वर्ग नेहमीच करतांना दिसतात.आज व्यापाऱ्याजवळ, राजकीय पुढाऱ्यांजवळ चारचाकी गाडी, बंगला,सोने-नाने,चल-अचल संपत्ती व अवैध संपत्ती दिसून येते हे आले कोठून? भारतातील शेतकरी राबराब राबतो परंतु आताही त्यांच्या नशिबी भोपळा आल्याचे दिसून येते.कारण कोणतीही सरकार असो ती पुर्णपणे व्यापाऱ्यांच्या व पुंजीपती यांच्या पाठीशी असल्याचे गेल्या ७७ वर्षांपासून आपण पहात आहोत.त्यामुळे आज शेतकरी वर्ग मागासलेला आहे.भारत स्वतंत्र झाल्यानंतर ही भारतीय शेतकऱ्यांनी जनतेला अन्न-धान्याची कमतरता पडू दिली नाही.परंतु चीनमध्ये १९७० मध्ये भुकमरीची महाभयानक लाट आली अशा परीस्थितीत चीनजवळ खायला अन्न-धान्य नव्हते.म्हणुन त्यांनी अन्न-धान्याऐवजी कुत्रे, मांजर, पाल, साप,कीडे-माकोडे व अन्य प्राणी खायला सुरुवात केली. चीनची ही भयावह स्थिती पहाता चीन सरकारने प्रतीबंधीत प्राण्यांना जनतेला नेहमी करीता खाण्याची परवानगी दिली. अशा कठीण परिस्थितीतुन जावुनसुध्दा आज चीन बलाढ्य देश बनला आहे.याचे संपूर्ण चीत्र आपल्याला वुहान प्रांतातुन दीसुन आले. परंतु भारतीय शेतकऱ्यांनी स्वतंत्र पुर्वकाळात व स्वतंत्र्यानंतरसुध्दा भारत वासीयांना अन्नची कमी पडु दीली नाही ही भारतीय शेतकऱ्यांची महानता आहे. परंतु सरकारच्या अन्न-धान्य साठ्याचे नियोजन गोडाऊन यांच्या कमतरतेमुळे दरवर्षी करोडो टन अन्नधान्य सडत असते आणि यातुनच उत्पन्न होते भुकमरी (उपासमारी)ची सुरुवात.आजही भारतात मेळघाट सारख्या व अतिदुर्गम अनेक भागात भुकमरी व कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते असे का?याचा अभ्यास राजकीय पुढाऱ्यांनी करण्याची गरज आहे. आज भारतात उलटी गंगा वाहतांना दीसते देशातील ६० टक्के शेतकऱ्यांकडे करोडो रुपयांची शेती आहे.परंतु आजही भारतीय शेतकरी गरीब आहे.याचे मुख्य कारण म्हणजे राजकीय पुढाऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी आतापर्यंत शेतकऱ्यांचे फक्त रक्त पिण्याचे काम केल्याचे दिसून येते.त्यामुळेच आज भारतात अनेक भागातील अन्नदाता शेतकरी आत्महत्यां करतांना दिसतो.कारण त्यांची संपूर्ण शेती निसर्गावर अवलंबून असते.आतातर वातावरणातील बदलाने शेतकऱ्यांना अत्यंत कठीण परिस्थितीत आनुण ठेवले आहे.विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकरी सरकारला विचारते की मुठभर नगरसेवक, आजी-माजी आमदार- खासदार व मंत्री मेहनत न करता पाच वर्षांत करोडपती व अरबोपती कसेकाय होतात? राजकीय पुढारी शेतकऱ्यांपेक्षा एवढा मोठा आहे का?की त्याला गलेलठ्ठ पगार, पेन्शन,इतर भत्ते सरकार देते व शेतकऱ्यांना भोपळा देते.हे लोकशाहीच्या देशात चालय्य तरी काय?सर्व राजकीय पुढारी सांगतात की आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत. समान अधिकार,समान न्याय असे खोकले आश्वासन देतात. परंतु आजच्या परिस्थितीत राजकीय पुढारीच शेतकऱ्यांचा घात करतांना दिसत आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांच्या प्रती जागरूकता दाखवुन विश्र्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत केली पाहिजे.आंतरराष्ट्री माहिती नुसार जगात उपाश्यापोटी झोपणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे सांगण्यात येत आहे.संयुक्तराष्ट्र खाद्य आणि कृषिसंघटना नुसार २००२ च्या तुलनेत खाद्यान्नवस्तुच्या किंमतीत १४० टक्याने भारीभरकम वाढ झाली आहे.यामुळे डिसेंबर २००७ पासुन ४० देशांना खाद्यांन्न संकटाचा सामना करावा लागत होता.सध्या गेल्या अडीच वर्षांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध भयावह स्थितीमध्ये आहे आणि आणि आता अचानक इजरायल-हमास-हिज्बुल्ला-इराण यांचा संघर्ष टोकाला पोहोचला आहे.यामुळे युध्दाचा भडका महाभयानक स्थितीत आहे.याचा परिणाम अन्नसाठ्यावर होवून अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे व पुढे आणखी भयावह होऊ शकते.भारतीय खाद्य निगमने स्वत: कबुल केले आहे की दरवर्षी गोदामातील ५० करोड रुपयांचा अनाज म्हणजे १०.४० लाख मीट्रिक टन पर्यंत अनाज सडतो किंवा खराब होतो.हीबाब कृषी प्रधान देशाच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर, दु:खद व चिंतेची आहे.कारण खराब होणारे अन्न-धान्य प्रत्येकवर्षी सव्वा करोड लोकांची भुक मीटवु शकते.परंतु भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की शेतकऱ्यांनी मेहनतीने तयार केलेला लाखो टन अनाज सडतो आणि यामुळेच भुकमरीची समस्या उद्भवत आहे याला नाकारता येत नाही. यामुळेच भारतात करोडो लोक उपाश्यापोटी झोपतांना दीसतात.भारताची हेही समस्या आहे की सहा वर्षांखालील ४७ टक्के मुले कुपोषणाची शीकार होत आहे.एफएओच्या माहिती नुसार भारतात २००८ मध्ये २० करोड १० लाख लोक भुकमरीचा सामना करीत होते.ग्लोबल हंगरच्या इंडेक्सने जारी केलेल्या २०२३ च्या आकडेवारीनुसार भारताचा विश्र्व भुकमरी सुचकांकमध्ये १२५ देशांच्या तुलनेत १११ वा नंबर लागतो ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे.या उलट भारताच्या शेजारील देशांचा विचार केला तर त्यांची परिस्थिती भारतापेक्षा चांगली आहे यात पाकिस्तान-१०२, बांगलादेश-८१, नेपाळ-६९, श्रीलंका -६० व्या स्थानावर आहे.गेल्या काही महिन्यांपासून देशातील २० कोटी लोकांना मोफत अन्न-धान्याची प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनाअसतांना सुध्दा भुकबळीची संख्या वाढत आहे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.भारतात सर्वमध्ये हेही लक्षात आले की लग्नसमारंभ, महाप्रसाद व अन्य जेवणाच्या कार्यक्रमात हजारो टन खाद्यान्न वाया जाते.याला कोठेतरी रोखलेच पाहिजे.आजच्या परीस्थितीत अन्नाचा प्रत्येक कन वाचवीण्याची गरज आहे.आज अन्नाचा प्रत्येक दाना महत्वाचा आहे. तेव्हाच म्हणतात दाने दाने पे लिखाण है, खाने वाले का नाम या म्हणीची पुर्तत: होवु शकते.आज १४० कोटी जनतेचे दायीत्व बनते की अन्नाचा प्रत्येक कण वाचवुन देशातील उपासमारी व कुपोषण यावर अंकुश लावला पाहिजे.विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने मी १४० कोटी जनतेला विनंती करतो की अन्नाचा एक-एक कण वाचवीण्याची नीतांत गरज आहे.कारण देशातील वाढती लोकसंख्या व जगातील युद्धजन्य परिस्थिती पहाता अन्न-धान्याचे जतन करने अत्यंत गरजेचे आहे.कारण भारतात बालकांच्या कुपोषणाची स्थिती अत्यंत वाईट आहे.त्याचप्रमाणे मी सरकारला आग्रह करतो की अन्न-धान्याचा काळाबाजार ताबडतोब रोखला पाहिजे व जमाखोरांच्या प्रती कठोर पाऊल उचलुन त्यांच्या मुसक्या आवरल्या पाहिजे.तेव्हाच विश्र्व खाद्य दिवसाला खरे महत्व येईल.संपुर्ण जग एकीकडे खाद्यांनासाठी आठा-पीटा करून वन-वन हिंडत आहे तर दुसरीकडे संपूर्ण जग युद्धाच्या उंबरठ्यावर येऊन बारूदच्या ढीगाऱ्यावर बसल्याचे दिसून येते. म्हणजेच आज जगात खाद्यान्ना पेक्षा दारूगोळ्याला जास्त महत्व दील्याजात आहे.याला कोठेतरी रोखलेच पाहिजे अन्यथा अनर्थ होवू शकतो.याकरिता जीवन जगण्यासाठी खाद्यांनाकडे प्रत्येक देशांनी तत्परता दाखवुन उपासमारी, कुपोषण,भुकमरी याला पुर्णविराम लावण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले पाहिजे यातच जगाचे कल्याण आहे.

*********

लेखक.
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी ,नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# अन्न परब्रम्ह, सर्वांचे आद्य: कर्तव्य

जागतिक अन्न दिन हा १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या स्थापनेच्या तारखेच्या स्मरणार्थ दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जगभरात साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय दिवस आहे. हा दिवस भूक आणि अन्न सुरक्षेशी संबंधित इतर अनेक संस्थांद्वारे मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो, ज्यामध्ये जागतिक अन्न कार्यक्रम, जागतिक आरोग्य संघटना आणि कृषी विकासासाठी आंतरराष्ट्रीय निधी. वर्ल्ड फूड प्राइज फाउंडेशनला २०२० चे शांततेचे नोबेल पारितोषिक भूकेशी लढा देण्यासाठी, संघर्षाच्या भागात शांततेसाठी योगदान देण्यासाठी आणि युद्ध आणि संघर्षासाठी शस्त्राच्या रूपात भुकेचा वापर थांबवण्यात प्रमुख भूमिका बजावल्याबद्दल मिळाले. २०१४ साठी जागतिक अन्न दिनाची थीम कौटुंबिक शेती ही होती. जगाला अन्न देणे, पृथ्वीची काळजी घेणे; २०१५ मध्ये ते सामाजिक संरक्षण आणि कृषी : ग्रामीण गरिबीचे चक्र तोडणे होते; २०१६ मध्ये ते हवामान बदलत आहे. अन्न आणि शेती देखील आवश्यक आहे, जी २००८ आणि त्यापूर्वी २००२ आणि १९८९ ची थीम प्रतिध्वनी करते. २०२० ची थीम वाढा, पोषण करा, टिकून राहा, एकत्र. आमच्या कृती हे आमचे भविष्य आहे. जागतिक अन्न दिनाची स्थापना अन्न आणि कृषी संघटनेच्या सदस्य देशांनी नोव्हेंबर १९७९ मध्ये संघटनेच्या २० व्या सर्वसाधारण परिषदेत केली. हंगेरीचे माजी कृषी आणि अन्न मंत्री डॉ. पाल रोमानी यांच्या नेतृत्वाखाली हंगेरियन शिष्टमंडळाने अन्न आणि कृषी संघटन परिषदेच्या २० व्या सत्रात सक्रिय भूमिका बजावली आणि जागतिक अन्न दिन जगभरात साजरा करण्याची कल्पना सुचवली. तेव्हापासून दरवर्षी १५० हून अधिक देशांमध्ये साजरा केला जातो, गरिबी आणि उपासमारीच्या समस्यांबद्दल जागरुकता निर्माण करते. १९८१ पासून, कृतीसाठी आवश्यक असलेल्या क्षेत्रांवर प्रकाश टाकण्यासाठी आणि एक सामान्य फोकस प्रदान करण्यासाठी जागतिक अन्न दिनाने दरवर्षी एक वेगळी थीम स्वीकारली आहे. अन्न आणि कृषी संघटना दरवर्षी वर्धापन दिनाचे स्मरण आणि प्रचार करण्यासाठी जागतिक अन्न दिन पदके जारी करते. बहुतेक थीम शेतीभोवती फिरतात कारण केवळ शेतीमधील गुंतवणूक - शिक्षण आणि आरोग्यासाठी समर्थनासह - ही परिस्थिती बदलेल. त्या गुंतवणुकीचा मोठा हिस्सा खाजगी क्षेत्राकडून आला पाहिजे, ज्यामध्ये सार्वजनिक गुंतवणूक महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, विशेषत: खाजगी गुंतवणुकीवर त्याचा सुलभ आणि उत्तेजक प्रभाव लक्षात घेता. अनेक विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेतील प्रेरक शक्ती म्हणून शेतीचे महत्त्व असूनही, या महत्त्वपूर्ण क्षेत्राला वारंवार गुंतवणुकीची कमतरता भासते. विशेषतः, गेल्या २० वर्षांत कृषी क्षेत्रासाठी परकीय मदतीत लक्षणीय घट झाली आहे.

अन्न हा कोणताही पदार्थ आहे, जो जीवांना पौष्टिक समर्थन प्रदान करण्यासाठी वापरला जातो. कर्बोदके, मेद, प्रथिने आणि पाणी यांनी बनलेला व पोषणासाठी प्राणी खाऊ शकतात असा कुठलाही पदार्थ. वनस्पती, प्राणी, कवक व किण्वन यापासून अन्न मिळते. अन्न सहसा वनस्पती किंवा प्राणी उत्पत्तीचे असते. अन्नामध्ये आवश्यक पोषक घटक असतात जसे की कर्बो दके, स्निग्ध पदार्थ, जीवनसत्त्वे, प्रथिने किंवा खनिजे. हे पदार्थ एखाद्या जीवामध्ये अंतर्ग्रहण केले जातात आणि जीवांच्या पेशीद्वारे ऊर्जा मिळवण्यासाठी, आयुष्य टिकवण्यासाठी, वाढ होण्यासाठी आत्मसात केले जातात. ऐतिहासिक दृष्ट्या, मानवांनी दोन पद्धतींनी अन्न सुरक्षित केले. पहिला शिकार गोळा करणे आणि दुसरा शेती ज्याने आधुनिक मानवांना प्रामुख्याने सर्वभक्षी आहार दिला. जगभरात मानवतेने असंख्य पाककृती आणि पाक कला तयार केल्या आहेत. ज्यात घटक, औषधी वनस्पती, मसाले, तंत्र आणि पदार्थांचा समावेश आहे. आज जगातील सतत वाढणाऱ्या लोकसंख्येस आवश्यक असणारी बहुतेक अन्न उर्जा अन्न उद्योगाद्वारे पुरविली जाते. आंतरराष्ट्रीय खाद्य संघटना, जागतिक संसाधन संस्था, जागतिक अन्न कार्यक्रम, अन्न व कृषी संघटना आणि आंतरराष्ट्रीय अन्न माहिती परिषद अशा संस्थांद्वारे अन्न सुरक्षा नियंत्रित केली जाते. ते टिकाव, जैविक विविधता, हवामान बदल, पौष्टिक अर्थशास्त्र, लोकसंख्या वाढ, पाणीपुरवठा आणि अन्न प्रवेश यासारख्या मुद्द्यांकडे लक्ष देतात. अन्नाचा हक्क हा आंतरराष्ट्रीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क (आयसीईएससीआर) आंतरराष्ट्रीय कराराद्वारे प्राप्त केलेला मानवाधिकार आहे. ज्याची ओळख पुरेशा अन्नासह समाधानकारक जीवनशैलीचा हक्क आणि भुकेपासून मुक्त होण्याचा मूलभूत अधिकार अशी आहे. अन्नाचा बहुतेक भाग सुंयगांच्या तीन प्रधान घटकांचा बनलेला असतो, कार्बोहायड्रेटे, वसा आणि प्रथिने. याशिवाय लवणे व खनिज द्रव्ये, जीवनसत्वे आणि इतर कार्बनी संयुगे व पाणी या सर्वांची प्राण्यांना अन्नात जरूरी असते.

बहुतेक अन्नाची उत्पत्ती वनस्पतींमध्ये होते. काही अन्न थेट वनस्पतींमधून प्राप्त केले जाते. परंतु जे अन्न स्रोत म्हणून वापरले जातात ते प्राणी देखील वनस्पतींमधून मिळणारे अन्न देऊन वाढविले जाते. तृणधान्य हे मुख्य अन्न आहे जे जगातील कोणत्याही प्रकारच्या पिकापेक्षा अधिक अन्न ऊर्जा देते. कॉर्न (मका), गहू आणि तांदूळ या सर्व प्रकारांचा जगभरातील धान्य उत्पादनात ८७% वाटा आहे. जगभरात पिकविलेले बहुतेक धान्य पशुधनांना दिले जाते. प्राणी किंवा वनस्पती स्रोत नसलेल्या काही पदार्थांमध्ये विविध खाद्य बुरशी, विशेषतः मशरूम समाविष्ट असतात. बुरशी आणि सभोवतालच्या जीवाणूंचा वापर आंबवलेले आणि लोणचेयुक्त पदार्थ जसे की खमीर घातलेली भाकर, मद्यपेय, चीज, लोणचे, कोंबुका (किण्वित चहा) आणि दही बनवण्यासाठी केला जातो. काही वर्षांपूर्वी एका मोठ्या कंपनीत कामाला वेग आणि आपल्या कुटुंबियांना आहे.

बऱ्याच वनस्पती आणि वनस्पतींचे भाग अन्न म्हणून खाल्ले जातात आणि सुमारे २००० वनस्पती प्रजाती अन्नासाठी लागवड केल्या जातात. या वनस्पती प्रजातींमध्ये अनेक भिन्न प्रकार आहेत. वनस्पतींची बियाणे हा मनुष्यांसह जनावरांच्या आहाराचा चांगला स्रोत आहे, कारण त्यात ओमेगा सारख्या अनेक आरोग्यदायी स्निग्ध पदार्थासह वनस्पतीच्या सुरुवातीच्या वाढीसाठी आवश्यक पोषक घटक असतात. खरं तर मानवाकडून खाल्लेले बहुतेक अन्न हे बीज-आधारित पदार्थ असतात. खाद्यतेल बियाणांमध्ये तृणधान्य (मका, गहू, तांदूळ, इत्यादी) शेंगा (सोयाबीन, वाटाणे, मसूर, इत्यादी) आणि शेंगदाणे यांचा समावेश आहे. तेलबिया बहुतेकदा चांगले तेल तयार करण्यासाठी दाबल्या जातात. सूर्यफूल, अंबाडी बियाणे, रॅपसीड (कॅनोला तेलासह), तीळ, इत्यादी. बियाण्यांमध्ये विशेषतः असंतृप्त स्निग्ध पदार्थ जास्त असतात आणि मध्यमतेमध्ये सकस अन्न मानले जाते. आजच्या दिवशी अन्नदात्या बळीराजाला धन्यवाद म्हणु या आणि दररोज अन्न शिल्लक राहून वाया जाणार नाही याची काळजी घेऊ या.

अन्न वाचवा, जग वाचवा !

जागतिक अन्न दिनाच्या शुभेच्छा!!

*********

प्रवीण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९

# पंचनामा

विधानसभा निवडणुकीचे पडघम सगळीकडे जोरात वाजू लागले आहेत. एकीकडे सरकारच्या निर्णयांचा धडाका सुरू आहे, तर दुसरीकडे विरोधकांच्या तोफा सरकारच्या विरोधात धडाडत आहेत. काल रविवारी महाविकास आघाडीतल्या तिन्ही पक्षांच्या वतीने राज्य सरकारच्या कामगिरीचे वाभाडे काढणारा 'पंचनामा' प्रकाशित करण्यात आला. महायुती सरकारच्या गैरकारभाराची वासलात त्यात लावण्यात आली आहे. त्यातील बहुतांश मुद्दे पटण्यासारखे आहेत. याचे मुख्य कारण महायुतीचे सरकार हे केवळ वरवर मलमपट्टी करणारे निर्णय घेत राहिले, लोकांना भुलवत राहिले, प्रचंड जाहिरातबाजी करत राहिले. पण लोकांच्या पदरात प्रत्यक्षात काहीच पडले नाही. 'लाडकी बहीण' योजनेत महिलांना प्रत्येकी १५०० रुपयांची मदत झाली ही बाब खरी आहे, परंतु ही योजना केवळ निवडणुकीच्या तोंडावर करण्यात आलेली योजना असून त्याचे भवितव्य काय, हा प्रश्न लोकांच्या मनात कायम आहे.

मुळात आर्थिकदृष्ट्या ही योजना शासनाला परवडणारी आहे काय, याचा विचार झालेला दिसत नाही. राज्याच्या अर्थखात्याने या योजनेला विरोध दर्शवला होता ही बाब त्याच वेळी उघड झाली होती, पण त्याकडे दुर्लक्ष करून केवळ निवडणूक जिंकण्याचे हत्यार म्हणून राज्य सरकारने ही योजना सुरू केली. मध्य प्रदेशात भाजप सरकारने 'लाडली बहना' योजना आणून निवडणुकीचे वातावरण फिरवले. त्याच आधारावर त्यांनी हा महाराष्ट्रात प्रयोग केलेला दिसतो. परंतु महाराष्ट्र किंवा महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता अशा तकलादू आणि दिखाऊ योजनांना पटकन भुलेल असे मानता येणार नाही. या सरकारच्या विरोधात मोठा आक्रोश आहे. मुळातच हे सरकार आधीचे महाविकास आघाडीचे सरकार पाडून आणि राज्यातील दोन महत्त्वाचे पक्ष फोडून आलेले सरकार असल्याने पहिल्या दिवसापासूनच या सरकारविषयी लोकांच्या मनात अविश्वासाचे वातावरण आहे. या फोडाफोडीच्या राजकारणावर आणि त्यातील तपशीलावर संपूर्ण देशभर वेळोवेळी सविस्तर चर्चा झालेली आहे. त्यावर येथे पुन्हा भाष्य करण्याची गरज नाही. पण लोकांच्या मनात या फोडाफोडीतून आलेल्या सरकारविषयी निश्चितच रोष आहे हे आपल्याला नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत दिसून आले आहे. महाराष्ट्रातील ४८ पैकी तब्बल ३१ जागा महाविकास आघाडीच्या पदरात पडल्या, हा निकाल या स्थितीचे नेमके वर्णन करणारा आहे. अलीकडेच राज्यातील काही माध्यम संस्थांनी निवडणूक पूर्व जनमत चाचण्या घेतल्या होत्या, त्यातही महाविकास आघाडीलाच अनुकूल वातावरण असल्याचे दिसून आले. अर्थात, हे जरी खरे असले तरी नुकत्याच झालेल्या हरियाणा विधानसभेच्या निवडणुका पाहता महाविकास आघाडीला इतका सरळ सोपा विजय मिळेल, असे गृहीत धरता येणार नाही. हरियाणात सर्व जनमत चाचण्यांमध्ये आणि मतदानोत्तर चाचण्यांमध्येही काँग्रेसला दोन तृतीयांश किंवा त्याहून अधिक बहुमत मिळेल, असे संकेत मिळालेले असतानाही काँग्रेस चक्क पराभूत झालेली दिसली. त्यामुळे त्यांना महाराष्ट्रात आता अधिक सावधगिरीने भाजपच्या नेतृत्वाखालील युतीचा सामना करावा लागेल.

# स्थानिक गुन्हे शाखेची अवैध धंद्यावर कारवाई. वाहनासह ३ लाख ४३ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू जप्त.



लातूर :- स्थानिक गुन्हे शाखेची अवैध धंद्यावर कारवाई. वाहनासह ३ लाख ४३ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू जप्त.

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांनी अवैध धंद्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करून लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढून त्यावर कारवाई करण्याची मोहीम राबवित आहेत.

अवैध धंद्याची माहिती काढत असताना दिनांक १४/१०/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकास खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे गांधी चौक हद्दीमध्ये लेबर कॉलनी परिसरात रोडवर एका लाल रंगाच्या स्विफ्ट कार थांबलेली असून त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ तंबाखूजन्य पदार्थाची अवैध विक्री व्यवसाय करण्यासाठी साठवणूक करण्यात आली आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर माहितीची शहानिशा करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक १४/१०/२०२४ रोजी गांधी चौक हद्दीमध्ये लेबर कॉलनी परिसरात रोडवर एका लाल रंगाच्या स्विफ्ट कार ताब्यात घेऊन पाहणी केली असता त्या मध्ये महाराष्ट्र शासनाने बंदी महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित असलेला ४३ हजार ३५० रूपयाचा गुटखा व सुगंधित पानमसाला असा व एक स्विफ्ट कार असा एकूण ०३ लाख ४३ हजार ३५० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित पानमसाला, तंबाखूचा मुद्देमाल मिळून आल्याने ते मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

प्रतिबंधित गुटका व सुगंधित तंबाखूची अवैधरित्या साठवणूक केल्याचे मिळून आलेले इसम नामे १) अमान जकियोदीन सय्यद, वय १९ वर्ष राहणार श्याम नगर, लातूर. २) समीर जकियोदीन सय्यद, राहणार श्याम नगर, लातूर यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे गांधी चौक पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अमलदार साहेबराव हाके , संजय कांबळे, मोहन सुरवसे, मनोज खोसे, राहुल कांबळे यांनी पार पाडली.

# केसर जवळगा!!गावचा तंटामुक्त कार्यालय घाणीच्या तंट्यात असल तर गावातील नागरिकांचा तंटामिटणार कसा?

धाराशिव / प्रतिनिधी :- केसर जवळगा शासनाने गावातील तंटे गावातच मिटावं व गाव गावातील सर्व मानव जात सर्व धर्म स्वमभाने गुण्यागोविंदाने राहावं ह्या उदेशाने व अनुषंगाने प्रत्येक गावामध्ये तंटामुक्तया ची स्थापना केली पण त्यास तंटामुक्तीचा दरवाजा २४ तास निष्काळजीपणाने खुलेआम राहत असेल तर याला तंटामुक्त असं कार्यालय नाव द्यायचं का तंटामुक्त महात्मा गांधीजी यांच्या नावाचं हा तंटामुक्त पण त्या तंटामुक्त कार्यालय याला व्यवस्थित नाव सुद्धा नाहीये तुम्ही पाहु शकता आज मोदीजी म्हणतात गाव हेच देश की जान और शान है मग या गावात असे काड घडत आहे. संबंधितावर या ढिसाळ कार्याचा व गांधीजीच्या नावाचा अपमान केल्याचा रोज जनतेतून एक रोष निघत आहे हे सर्व पाहून यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे काव्हहा गाव चाललाय कुठे याला जबाबदार कोण तंटामुक्त अध्यक्ष का गावचा सरपंच उपसरपंच ग्रामसेवक वरिष्ठ याला जवाबदार कोण का मी म्हणजे शाना! हे बघावे लागले स्थानिक गावातील नेत्यांना तंटामुक्त अध्यक्षांना याची काय लाज वाटते का ज्या कार्यालयामध्ये काही आपल्या गावात तंटा झाला तर त्यांचं समाधान करण्यासाठी त्यांना समजण्यासाठी या ठिकाणी बोलवलं जातं पण त्याच कार्यालय मध्ये ही दैनिक



अवस्था असेल तर स्वच्छ भारत अभियान गेला कुठं येथे दिसते का आमच्या दैनिक जय हिंद महाराष्ट्राच्या जिल्हा प्रतिनिधींनी तेथील व्हिडिओ शूट केला ही अशी अवस्था एकीकडे गुटका खाऊन थुकलेला प्रकार दिसतो एकीकडे अनेक बाटल्या खालच्या बेछान्याची वेगळी अवस्था २४ तास दार उघडे त्याला तंटामुक्त कार्यालय म्हणायचं का जनावराचा एजा करणारा कोटा हेच नागरिकांना कळत नाहीये गावातील नागरिकांनी या संबंधितांना अनेक माध्यमातून या कार्यालयाची अवस्था बिकट होत आहे.हे सांगण्याचा वेळोवेळी प्रयत्न केलेला आहे.पण अनेक माध्यमातून असे समजते की नागरिकांमध्ये तंटामुक्त अध्यक्ष व गावातील इतर नेते यांची वेगळी काही दहशत आहे म्हणून त्यांना जॉब कोणी विचारलं नाही पण आज आम्ही हा फुटेज संबंधित मंत्रालय संबंधित विभाग सर्व स्तरावर पाठवत आहोत कारण आम्हाला गावचा विकास हवा आहे गावचा तंटामुक्त ऑफिस सुंदर स्वच्छ पर्सनशील असला पाहिजे हा आमचा उद्देश आहे जर याची तंटामुक्त अध्यक्षांना परवा नसेल मग ते गावातील नागरिकांचा तंटा मिटवणार कुठे यावरून कळतं गावचे तंटामुक्त कार्यालयाची अवस्था हे असेल तर बाकी कार्यालयाच्या अवस्था काय असेल गावची अवस्था काय असेल वार्डा वार्डाची अवस्था काय असेल रस्त्याची अवस्था काय असेल यावरूनच आपल्याला हा आरसा दिसतो हे आम्ही निर्भीड पणे व जनहितार्थ आपल्यापुढे आणत आहोत. तंटामुक्त कार्यालयाची अवस्था आओ जाओ घर तुम्हारा असे असेल तर गावाला एक आदर्श गाव म्हणून सन्मान मिळणार कधी... हे गावातील सुजान व दक्ष नागरीकांना पडलेला मुळ प्रश्न आहे.... आमचा एकच ध्यास गावचा विकास माझ्या गावाला आदर्श गाव म्हणून पुरस्कार मिळाला पाहिजे...

### केसर जवळगा येथील वार्ड २,३,ची रोड नाली आणि अन्य नागरिक सुविधा कोमात गावाच्या विकासासाठी असंख्य निधी आणुन सरपंच आणि उपसरपंच जोमात

धाराशिव:केसर जवळगा या गावांमध्ये गेल्या दोन टर्म पासून एक हाती सत्ता हाकलणाऱ्या सरपंचाचा कहर गावातील अनेक वार्डाच्या अनेक बोगस कामामुळे नागरिक सुविधा शून्य दिसत आहे. त्या मध्ये आता काही पाहिलं गेलं तर काही वार्डांच्या रोड नाली लाईट व पाणी याची अवस्था जेमतेम आहे.पण या तुलनेतील वार्ड क्रमांक २,३,ची अवस्था अतिशय बिकट झालेली आहे त्या ठिकाणी रोड व्यवस्थित नाही.त्या ठिकाणी गटर व्यवस्थित नाही. गटर तुडुंब भरून वाहत आहे.त्या गटारीच्या घाणेरड्या कचऱ्यामुळे त्या ठिकाणी मच्छरांचा प्रादुर्भाव वाढत आहे अशाने नागरिकांमध्ये अनेक रोगांची वाढ झालेली आहे.या ढिसाळ नागरिक सुविधामुळे नागरिक त्रस्त जीवन जगत आहेत.पण गावांमध्ये सरपंच आणि उपसरपंच यांची वार्डाला पाहणी करण्यासाठी वेळ नाही. असे जनतेतून बोलले जात आहे मच्छर अतिवाढ झाल्याने नागरिकांना मोठ्या साथीच्या रोगाला बळी पडू लागत आहे व हाताला काम नाही त्यामध्ये काही उरलेले पैसे दवाखान्यामध्ये घालण्याचे पाळी येत आहे मग याला जबाबदार कोण आहे ग्रामपंचायतला अनेक निधी येऊन सुद्धा या वार्डची अवस्था दयनीय का शासनाच्या सर्व सुविधा स्थानिक ग्रामपंचायतीला असून सुद्धा सरपंच उपसरपंच गावाच्या नागरिक सुविधा कडे दुर्लक्ष करत काय आहेत नागरिकांमधून असंही बोललं जात आहे की येत्या विधानसभेच्या आमदारकीच्या अनेक गप्पा अनेक गोपनीय मीटिंगमध्ये हे वेस्त आहेत.पण गावाच्या व नागरिकांच्या समस्या कडे यांची पाठ आहे मी गावचा विकास करतो म्हणून मत घेऊन आता त्याच नागरिकांच्या जीवाशी हे गावातील नेते खेळ खेळत आहेत आपल्या राहत्या परिसराची अशी दुरवस्था नेहमी होत असल्याने काही लोकांनी आमच्याशी संपर्क साधला आम्ही तिथली चित्रीकरण करून जनहितार्थ तात्काळ ही सुविधा ग्रामपंचायतीने पुरवावे म्हणून ही बातमी घेत आहोत या वार्डामधील काही नागरिक सुविधा रोड नाली रस्ते याचा स्वच्छतेचा काम तात्काळ करण्यात यावा अन्यथा येणाऱ्या काळामध्ये ग्रामपंचायतीला टाळा ठोकून २,व ३ नंबर वार्डचा कचरा ग्रामपंचायतीच्या दारामध्ये आणून मोठा जन आक्रोश आंदोलन छेडण्यात येईल.. असा इशारा नागरिकांनी आमच्याशी बोलताना दिला दिला आहे!!

# महाराष्ट्रातील भाविकांसाठी अयोध्येत राम जन्मभूमी मंदिर परिसरात महाराष्ट्र भक्त सदन लवकरच उभे राहणार

### सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते अयोध्येमध्ये भूमिपूजन सोहळा पार पडला

लातूर / प्रतिनिधी :- लोकसभा निवडणुकांपूर्वी म्हणजेच जानेवारी २०२४ मध्ये केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाजप सरकारच्या कार्यकाळात गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेले भव्य-दिव्य राम मंदिर उभारल्यानंतर देशभरातून भाविक व राम भक्तांनी अयोध्येत दर्शनासाठी गर्दी केली होती. तर, महाराष्ट्रातूनही भाविक मोठ्या प्रमाणात अयोध्येला रामललाच्या दर्शनासाठी गेले होते. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मंत्र्यांसह रामललाचे दर्शन घेतले होते त्यावेळी अयोध्येत महाराष्ट्र भक्त सदन बांधण्याची घोषणा त्यांनी केली होती. त्यानंतर अयोध्येत राम जन्मभूमी मंदिर परिसरात महाराष्ट्र भक्त सदन उभारण्यासाठी राज्य शासनाने जूनमध्ये जमीनही खरेदी केली होती. या जागेवर पर्यावरण पूरक हरित इमारत बांधण्यात येणार आहे. या इमारत बांधणीचे भूमिपूजन नुकतेच महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण व उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. महाराष्ट्रातील जनतेसाठी हा अतिशय आनंदाचा क्षण असल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यावेळी म्हणाले. याबाबत अधिक माहिती देताना मंत्री रविंद्र



चव्हाण म्हणाले की जवळपास ९५०० चौरस मीटर क्षेत्रफळावर १२ मजली भव्य महाराष्ट्र भक्त सदन उभे राहणार असून त्या ठिकाणी ६५० पर्यटक राहू शकतील, असे भव्य भक्त निवास साकारणार आहे. भक्त निवासात एकूण ४ व्हीआयपी कक्ष, ९६ खोल्या असून ४० डॉर्मिटरी बांधण्यात येणार आहेत. पुढील तीन वर्षात हे महाराष्ट्र भक्त सदन बांधून पूर्ण करण्यात येणार आहे. हे भक्त सदन अयोध्येतील महत्त्वाच्या सर्व स्थळांपासून जवळ आहे. महर्षी वाल्मिकी विमानतळ पासून ११.५ किमी, श्रीराम जन्मभूमी मंदिर पासून ७.५ किमी तर अयोध्या रेल्वे जंक्शनपासून ४.५ किमी अंतरावर आहे. श्रीरामाचे आणि महाराष्ट्राचे पौराणिक नाते असून श्रीरामाला गोदातीर पाहिल्यावर शरयू नदी तटाची आठवण झाली. त्यातूनच महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश यांच्यात धार्मिक आणि सांस्कृतिक नाळ जुळली. रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र हे समस्त भारतीयांसाठी धार्मिक आणि भावनिक असून महाराष्ट्रातील शेकडो स्वयंसेवक आणि कारसेवक यांनी त्यासाठी प्रखर संघर्ष केला. श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाल्यावर महाराष्ट्रातील भाविकांसाठी जून महिन्यात अयोध्येत महाराष्ट्र भक्त सदन बांधण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून उभारण्यात येणारे हे महाराष्ट्र भक्त सदन म्हणजे याच भावनिक नात्याचे पुढचे पाऊल आहे, असे मंत्री रविंद्र चव्हाण यांनी यावेळी म्हणाले. दरम्यान, या भूमिपूजन सोहळ्यासाठी उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य, अयोध्या हनुमान गढीचे महंत राजू दासजी महाराज, अयोध्येचे आमदार वेदप्रकाश गुप्ता, महापौर गिरीशपती त्रिपाठी, सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सचिव (रस्ते) सदाशिव साळुंखे, सचिव (इमारती) संजय दशपुते, मुख्य अभियंता राजेंद्र रहाणे, अधीक्षक अभियंता विवेक बडे, मुख्य अभियंता रणजित हांडे, अधीक्षक अभियंता प्रमोद बनगोसावी आदि मान्यवर उपस्थित होते.

# जागेअभावी अतिरिक्त सत्र न्यायालय माहूरला स्थलांतरीत करण्याच्या हालचाली

किनवट/शेख शौकत :-वकिल संघासह पत्रकार आणि नागरीकांच्या मागणीला शासन स्तरावर प्रतिसादही मिळून अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायालय मिळाले. परंतू योग्य इमारती अभावी माहूरकडे स्थलांतरीत होण्याच्या हालचालींना वेग आल्याची चर्चा उफाळली आहे. चार महिन्याचा काळ लोटला तरीही किनवटमध्ये इमारत उपलब्ध होत नसल्याची खंत व्यक्त करण्यात येत आहे. किनवटला मिळालेले न्यायालय माहूरला दिल्यास नागरीकांनी आंदोलनाचा ईशारा दिला असून वकिल संघही उच्च न्यायालयाचे दार खटखटणार असल्याचे सांगितले. किनवटला महतप्रयासातून मिळालेल्या अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायालयाला किनवट नगर परिषदेच्या हद्दीत शासकीय इमारत मिळत नसेल तर नक्कीच ही बाब भूषणावह नाही. किनवट तालुका वकिल संघाने, पत्रकारांनी शिवाय जनतेच्या मागणी आणि पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र सरकारने दखल घेऊन न्यायालय दिले. चार महिन्याचा कालखंड लोटला. जिल्हा न्यायाधिशांनी उपलब्ध इमारतींची पहाणी करुन आढावा घेतला मात्र इमारत उपलब्ध होऊ शकली नसल्याचे वृत्त आहे. माहूरमध्ये चार सत्र चालण्याच्या क्षमतेची सोयीनियुक्त इमारत उपलब्ध असून पाचव्या सत्रासाठी डायस उपलब्ध करण्याच्या हालचालींना वेग आल्याचे समजते. एकून हालचाली लक्षात घेता हे अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायालय माहूरला वळवल्याची शक्यता बळावली आहे. अगदी त्या विरुद्ध वकिल संघ उच्च न्यायालयात जाणार असल्याच्या हालचालींनाही वेग आल्याचे सूत्रांकडून समजते. न्यायालय स्थलांतर रोखण्यासाठी पत्रकारं आणि नागरीकांना पुन्हा एकदा न्याय मागणी घेऊन रस्त्यावर उतरण्याची शक्यता व्यक्तविली जात आहे.

# महायुती सरकारने महाराष्ट्राला दिल्ली पुढे झुकवले: आमदार धिरज देशमुख

## कार्यकर्ता संवाद मेळाव्यात भाजप, महायुती सरकारवर केली टीका

प्रतिनिधी / लातूर- पुरोगामी विचाराचा महाराष्ट्र, छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्र कधीच दिल्ली पुढे झुकला नाही. परंतु, महायुती सरकारने महाराष्ट्राला दिल्ली पुढे झुकवले आहे. महाराष्ट्राच्या जनतेला अडाणी समजून अदानी उद्योगाला मदत करण्याचे धोरण या सरकारचे आहे. या माध्यमातून ते महाराष्ट्राची लूट करत असल्याचा हल्लाबोल लातूर ग्रामीण मतदारसंघाचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केला. लातूर ग्रामीण मतदारसंघातील काडगाव (ता.लातूर) व रेणापर तालुक्यातील पानगाव जिल्हा परिषद गट व रेणापूर नगरपंचायती अंतर्गत गावांतील कार्यकर्त्यांसाठी आयोजित संवाद बैठकीमध्ये ते बोलत होते. या बैठकीस प्रमुख पाहुणे म्हणून सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, यशवंतराव पाटील, सर्जेराव मोरे, लक्ष्मणराव मोरे, जगदीश बावणे, रविंद्र काळे, श्रीपती काकडे, लालासाहेब चव्हाण, अप्पा मुंडे, उमाकांत खलंग्रे, सुभाष घोडके, प्रमोद जाधव, दिलीपराव पाटील, चंद्रचूड चव्हाण, दैवशाला राजमाने, गंगासिंह कदम, पृथ्वीराज शिरसाठ, तुकाराम कोल्हे, अनुप शेळके, संभाजी सूळ, नरसिंग बुलबुले, अशोक काळे, गोविंद बोराडे, संतोष देशमुख, शेषराव हाके, कैलास पाटील, हर्षदराव लहाने, बी. के. आचार्य, जयंत कुलकर्णी, रघुनाथ शिंदे, राजकुमार पाटील, श्रीनिवास आकनगिरे, प्रदीप राठोड, जनार्दन वंगवाड, अँड. शिरसाठ, बळवंत काळे, बाळासाहेब कदम, दत्ता शिंदे, पूजा इगे, निर्मला गायकवाड, शाम शास्त्री, राम राजमाने, अजित राडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

जागतिक आरोग्य संघटनेने केलं कौतुक

आमदार धिरज देशमुख पुढे म्हणाले, महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला न शोभणारे काम महाराष्ट्राचे सरकार करत आहे. कोरोना काळामध्ये जर हे सरकार असते. तर जनतेचे काय झाले असते असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. जागतिक आरोग्य संघटनेने सुद्धा महाराष्ट्र सरकारने कोरोना काळामध्ये उत्तम काम केले असल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, तत्कालीन वैद्यकीय मंत्री अमित विलासराव देशमुख, आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी गाव-खेड्यापर्यंत लस, रेमिडेसिव्हर इंजेक्शन पुरवण्याचे काम केलेल आहे. पण त्याची जाहिरात त्यांनी कधी केली नाही. पण हे सरकार जनतेच्या पैशावर जाहिराती करत आहे. जनतेला अडाणी समजून अदाणीला मदत सर्वसामान्य जनतेचे हित जोपासणे हे सरकारचे काम असते, असे सांगून सरकारने गुजरातचा विकास केला, उद्योगपतींना श्रीमंत केले. नऊ कोटी मतदार असलेल्या महाराष्ट्रावर नऊ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. लोकसभा निवडणुकीनंतर सरकारने एक लाख कोटींच्या घोषणा केल्या आहेत. निवडणूक समोर ठेवून घोषणा केल्या जातात का? महाराष्ट्राची लूट महाराष्ट्राच्या जनतेला अडाणी समजून अदाणीला मदत करत असल्याचे ते म्हणाले. जिल्हा परिषद शाळेच्या बांधकामासाठी सरकारकडे पैसे नाहीत. चाळीस हजार कोटीची कॉन्ट्रॅक्टरदारांची बिले थकलेली आहेत. सरकार दिवाळखोरीत निघालेले आहे आणि या सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांचा पुरोगामी महाराष्ट्र दिल्ली पुढे झुकवला असल्याची जहरी टीका त्यांनी केली . महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळवले जात आहेत. मांजरा परिवाराने लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सहकार्यांने एकाच वेळी १०० हार्वेस्टरचे (ऊस तोडणी यंत्र) वाटप केले आहे. बेरोजगारांना काम दिले आहे. मांजरा परिवार व जिल्हा मध्यवर्ती बँकेने तुती लागवड करणाऱ्या रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना तीन लाखापर्यंत बिनव्याजी कर्ज दिले असल्याचे त्यांनी सांगितले. महिला सक्षम झाल्या पाहिजेत याच्यासाठी बचत गटांना ही वाढीव कर्ज आम्ही देत असल्याचे ते म्हणाले. उमेदवार कोणीही असला तर लातूर शहर आणि लातूर ग्रामीणमध्ये काँग्रेसचाच उमेदवार निवडून येणार असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

श े त क ऱ्या ला

सन्मान निधीपेक्षा सोयाबीनला भाव द्या येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदार संघांमध्ये शांतता राहिली पाहिजे. गुंडगिरी होता कामा नये. ज्यांना शेती कळते, त्यांना राजकारण ही कळते. महाराष्ट्र सरकारने अख्खे मंत्रिमंडळ गुजरात मार्गे गुवाहाटीला नेले. असे काम काँग्रेसने कधीच केले नाही, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना पाचशे रुपये सन्मान निधी देण्यापेक्षा त्याच्या सोयाबीनला किमान सहा हजार रुपये द्या. असे सांगून बाहेरच्या देशाचे सोयाबीन अदानी उद्योग समूह खरेदी करतो आहे. बाहेरून सोयाबीन आणण्यापेक्षा लातूरच्या शेतकऱ्याचे सोयाबीन या सरकारने खरेदी करावे, असे ते म्हणाले.

सुप्रीम कोर्ट न्याय देऊ शकले नाही. आत्ता या सरकारचा निकाल लावण्याचा निर्णय महाराष्ट्रातील जनतेच्या दरबारात आला आहे. म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकवता कामा नये असे सांगून विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा कारखाना पाहण्यासाठी जसे ब्राझीलहून माणसे आली, जिल्हा मध्यवर्ती बँक पाहण्यासाठी नाफेडची माणसे आली. येणाऱ्या काळात लातूर मतदार संघ पाहण्यासाठी सुद्धा बाहेरून माणसे येथील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला .







सत्तेवर आल्यावर शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू, दोन कोटी रोजगार देऊ, प्रत्येक व्यक्तीला पंधरा लाख रुपये देऊ असे म्हणणारी भारतीय जनता पार्टी सत्तेत असताना काम करू देत नाही आणि सत्तेत आल्यावर काम करत नाही. चारशे रुपयांचा गॅस एक हजार रुपये गेला. निवडणूक म्हणजे शिमगा नसून ते एक लोकशिक्षण आहे. आम्ही कधी भेदभाव केला नाही. विरोधकांनाही सढळ हाताने मदत केली आहे, आमची भावना सामाजिक बांधिलकीची आहे.

गुळ पावडर काढणारे साखर कारखान्यावर बोलतात असा प्रश्न उपस्थित करून आमच्याबरोबर स्पर्धा जरूर करा, ऊसालाही चांगला भाव द्या, असा सल्लाही त्यांनी विरोधकांना दिला.

# कर्मचाऱ्यांच्या जुनी पेन्शन, पदोन्नतीसाठी आझाद मैदान, मुंबई येथे 'कास्ट्राईब'चे धरणे आंदोलन

## महासंघाच्या नागपुरातील अधिवेशनात राज्यातील २९ प्रमुख संघटनातील कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग.






लातूर :– कास्ट्राईब कर्मचारी संघटना ही शासनसोबत विविध प्रलंबित प्रश्नावर चर्चा करुन मागासवर्गीय बहुजन कर्मचा–यांना न्याय देण्याचे काम करते. या संघटनेचे प्रस्तावित ध्येय व धोरणे साध्य करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिली. महासंघाचे ४४ वे अधिवेशन डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्वेशन सेंटर, नागपूर येथे (दि.११ रोजी) तेथील सभागृहात पार पडले. अधिवेशनाचे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याहस्ते झाले. त्यावेळी श्री.आठवले यांनी दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष कृष्णा इंगळे हे होते तर नागपूर भूमिअभिलेख उपसंचालक विष्णु शिंदे, रिपाईचे ज्येष्ठ नेते भुपेश भूलकर, ॲड. प्रदीप वठारे अधिवक्ता मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर व ॲड. प्रदीप दंडवते अधीवक्ता मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर, महासंघाचे सरचिटणीस उत्तम सालवणकर,कार्याध्यक्ष गणेश मडावी, वरिष्ठ उपाध्यक्ष सुमित भुईगळ, मनोज कांबळे, लातूर जिल्हाध्यक्ष नितीन बनसोडे, सरचिटणीस अशोक माळगे, संघटक नागरत्न कांबळे यांच्यासह महाराष्ट्रातील महासंघाचे विविध पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या हितासाठी शासनाकडे शांततेच्या मार्गाने मोर्चो, आंदोलन, उपोषण करुन चर्चा करण्यासाठी शासनास भाग पाडून सर्व सामान्य कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देणारे महाराष्ट्रातील श्री. इंगळे हे एकमेव चळवळीतील नेते आहेत. यावेळी त्यांनी त्यांच्या विविध कार्याचा गौरव केला. कास्ट्राईब संघटना ही महाराष्ट्रभर कार्यरत असून कर्मचाऱ्यांच्या भरती पदोन्नती व सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी वाहून घेतले आहे. केंद्र व राज्य सरकारकडे कर्मचाऱ्यांच्या हिताचे प्रस्ताव दाखल केल्यास तातडीने प्रशन मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. अध्यक्षीय भाषणात श्री.इंगळे म्हणाले की, संघटनेच्या माध्यमातून मागासर्गीयांच्या भरती व पदोन्नतीतील आरक्षणासाठी विविध ठिकाणी धरणे आंदोलन केले आहेत. आता आजाद मैदान, मुंबई येथे महाराष्ट्रातील सर्व संघटनांच्या वतीने कास्ट्राईबचे लवकरच आंदोलन करण्यात येणार आहे. मागासवर्गीय कर्मचा–यांच्या अन्यायाविरुध्द लढा देणारी महाराष्ट्रातील एकमेव संघटना आहे. ही संघटना ५५ वर्षापासून कार्यरत आहे. एस.टी. कर्मचारी, सामाजिक न्याय विभागातील प्रश्न, शिक्षण विभाग, विशेष भरती सुरु करणे, बदल्या, शिष्यवर्ती मर्यादा वाढविणे, पदोन्नती व भरती, विद्यापीठे व कृषि विभाग, पोलीस अदि विविध खात्यातील असंख्य केसेस सोडवून कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून दिला. शासनाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव्य केलेल्या ४१ ठिकाणच्या संवर्धनासाठी सुमारे ३९ कोटी रूपये निधी उपलब्ध करून दिला. याचा मला आनंद आहे. तसेच संघटनेच्या वतीने दरवर्षी एक याप्रमाणे ४३ मागासवर्गीय गरजू विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले. माझा एकच नारा आहे की, भविष्यातील अडचणीवर मात करण्यासाठी बचत करा, व्यसन सोडा आणि शिक्षण घ्या. यावेळी कार्याध्यक्ष गणेश मडावी म्हणाले की, शासनाने किरकोळ पत्र काढून मागावर्गीयांची पदोनन्ती बंद केली.हा अन्याय सहन केला जाणार नाही. एस.टी./एस.सी. यांचे उपवर्गीकरण व क्रिमिलेअरबाबत दिलेला निकाल व आरक्षणावर होणारा अ,ब,क, ड चा परिणाम लक्षात घेता उच्च न्यायालयात दाद मागणार असून यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन केले. याच विषयावर सतिष कांबळे, उत्तम सालवणकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रस्ताविक महासंघाचे वरिष्ठ उपाध्यक्ष सुमित भुईगळ यांनी केले. सूत्रसंचालन विभूतीचंद्र गजभिये तर परसराम गोंडाणे आभार यांनी मानले. अधिवेशनास राज्यातील विविध जिल्ह्यातील २९ प्रमुख संघटनांचे पदाधिकारी सहभागी होते. अधिवेशानातील संमत ठराव मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची पदोन्नती, रिक्त पदे भरणे, एस.टी./एस.सी. यांचे उपवर्गीकरण व क्रिमिलेअरबाबत दिलेला निकालाविरुध्द उच्च न्यायालयात जाणार, जुनी पेन्शन योजना लागू करा. शासकीय कंत्राटी भरती, शाळांचे खासगीकरण करू नये. सर्व विभागांमध्ये नवीन पदभरती, पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करा. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्या पदोन्नती करा. विविध विभागातील रिक्त पदे प्राधान्याने भरा, आदी ठराव अधिवेशनात एकमताने संमत करण्यात आले. ' विशेष कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा चा गौरव ' श्री. किशोर रामटेके यांचा विशेष सत्कारमूर्ती म्हणून तर विशेष कार्य करणाऱ्या विभूतिचंद्र गजभिये, उत्तम सालवनकर, आर. एम.कांबळे, लक्ष्मण वानखेडे, सतीश कांबळे, चंदन चावरिया, प्रभाकर सोंनडवले, डॉ. सुभाष गायकवाड, सुभाष डोंगरदेवे कर्मचारी यांचा कृष्णा इंगळे यांच्या हस्ते सन्मान चिन्हे, शाल व गुलदस्ता देऊन सत्कार करुन गौरविण्यात आले.

# आनंद दत्त धाम आश्रम माहूर येथे जिल्हास्तरीय गोल्ला गोलेवार यादव समाजाचा मेळावा संपन्न.

नांदेड / प्रतिनिधी :– नांदेड – माहूर येथे गोल्ला गोलेवार यादव महासंघाच्या वतीने दर वर्षी घेण्यात येणारा गुणवंतांचा गौरव व समाजभूषण पुरस्कार कार्यक्रम आनंद दत्त धाम आश्रम श्रीक्षेत्र माहूर येथे मोठ्या थाटामाटात, हजारो समाज बांधवांच्या उपस्थित संपन्न झाला.

सदर मेळाव्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, नव नियुक्त कर्मचारी अधिकारी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यंदाचा विशेष समाज भूषण पुरस्कार संपूर्ण देशात स्वच्छता अभियान राबवून शांततेचा संदेश देणारे, सर्व समाजांच्या तळागाळातील लोकांपर्यंत जावून समाज प्रबोधन करणारे, आनंद दत्त धाम आश्रम माहूर गड येथे दर रोज अविरत अन्नदान करणारे राष्ट्रसंत सद्गुरू श्री द.भ.प. साईनाथ महाराज वसमतकर, बितनाळकर यांना प्रदान करण्यात आला, तसेच समाजासाठी सेवेचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ समाज सेवकांचा दरवर्षी देण्यात येणारा समाज भूषण पुरस्कार ज्येष्ठ समाज सेवक श्री दिगंबरराव बाबाराव करेवाड कोल्हारी ता. किनवट व ज्येष्ठ समाज सेवक श्री दगडूजी संतोबा काईतवाड रा. बोरगडी ता. हिमायतनगर यांना प्रदान करण्यात आला. व तसेच नायगाव पं.स.चे सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी श्री आर.एम.चिकलवाड सरांचा सेवानिवृत्ती निमित्त समाजातर्फे सन्मान करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक श्री देविदासजीं फुलारी यांचे विद्यार्थी व समाज बांधवांसाठी शैक्षणिक व सामाजिक विषयांवर उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले. व तसेच राष्ट्रसंत श्री साईनाथ महाराज यांनी समाज बांधवांनी एकत्र राहून समाजासाठी निष्ठेने कार्य केले पाहिजे, समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी सामाजिक भावना ठेवून समाजासाठी प्रामाणिक काम केले पाहिजे, समाज कार्य करीत असताना राजकीय हेतू ठेवून समाजाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न समाज प्रमुखांनी करू नये. समाजासाठी एकनिष्ठ राहून प्रामाणिक कार्य करणाऱ्या समाज बांधवांना माझा खंबीर पाठींबा कायम राहील, माझा सदैव आशीर्वाद राहील, परंतु समाजासाठी अप्रामाणिक वागून दिशाभूल करणाऱ्यांच्या पाठीशी मी कधीही उभा राहणार नाही, असा सज्जड इशारा देवून राष्ट्रसंत श्री साईनाथ महाराज यांनी समाजास संबोधित केले.

यावेळी समाज भूषण श्री दिगंबरराव करेवाड यांनी सर्व समाज बांधवानी एकत्र कार्य करावे, समाजाचे गट ताटात विभाजन करू नये अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी उप शिक्षण अधिकारी श्री गजानन आक्कमवाड यांनीही विद्यार्थ्यांना व उपस्थित समाज बांधवांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात, समाजातील व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे व्यसन राहू नये अथवा जडू नये म्हणून गोल्ला गोलेवार यादव महासंघाचे प्रांत अध्यक्ष श्री भुमन्ना आक्केमवाड भोसीकर यांचे हस्ते व्यसन रुपी रावणाचे दहन करून व्यसन मुक्तीचा संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री पी. पी. फांजेवाड हे होते तर प्रमुख अतिथी व वक्ते म्हणून जेष्ठ साहित्यिक श्री देविदास फुलारी हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रांत महासचिव श्री एस. टी. गालेवाड यांनी केले तर कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचलन श्री पी.जी. रूद्रवाड सर व श्री परशूराम आक्कमवाड सर यांनी केले.

या कार्यक्रमाच्या नियोजन साठी श्री भाऊसाहेब पा. हडसनीकर व त्यांची टीम, श्री माधवराव वटपलवाड सर, जिल्हा सचिव श्री अशोकरावं कासराळीकर, श्री देवीदास आक्कमवाड सर, श्री बालाजीराव शेणेवाड सर, जिल्हा कोषाध्यक्ष श्री तुकाराम कैलवाड, जिल्हा कार्याध्यक्ष श्री रमेशराव रामपुरवार, प्रदेश अध्यक्ष युवक महाराष्ट्र राष्ट्रीय यादव महासभा दिल्ली.तथा जिल्हाध्यक्ष युवक अभिषेकजी बकेवाड, श्री विठ्ठलराव जकिलवाड, श्री गोविंदराव भुसलवाड,मुदखेड ता. अध्यक्ष श्री रामजी गवंडेवाड आदींनी परिश्रम घेतले व तसेच गोदावरी जंगीलवाड यांनी सुंदर रांगोळी काढून आपल्या कलेचा आविष्कार सादर केला.

# लातूर न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल, धनादेश न वटल्या प्रकरणी आरोपीस रुपये २६ लाख रुपये दंड व ६ महिने कारावास भोगण्याची शिक्षा!


लातूर /प्रतिनिधी ;– अधिक माहिती अशी की, फिर्यादी अमर आनंदराव जाधव–पाटील यांचे आरोपी ऋषिकेश दत्तात्रय पाटील रा. बोधे नगर लातूर यांच्याशी मित्रत्वाचे संबंध होते. त्यांनी ऋषिकेश पाटील यास त्याचे बहिणीच्या लग्नाचे कर्ज फेडण्यासाठी व व्यवसाय वाढी साठी दि. २१/०५/२०१४ रोजी १६ लाख रुपये सहा महिन्यांत परत करण्याच्या हमीवर दिले. परंतु, सहा महिने उलटल्यानंतरही ऋषिकेश पाटील याने अमर जाधव –पाटील यांना रक्कम दिली नाही. त्यामुळे अमर जाधव – पाटील यांनी पुन्हा–पुन्हा पैशाची मागणी केली. त्यावेळी ऋषिकेश पाटील याने आय सी आय सी आय बँक, औसा रोड लातूर, बँकेचा रुपये १६ लाख रुपयांचा धनादेश अमर जाधव –पाटील यांना दिला. हा धनादेश आरोपीचे खाते बंद असल्यामुळे वटला नाही.


> हात उसने पैसे परत करण्यासाठी दिलेला धनादेश न वटल्या प्रकरणी ऋषिकेश दत्तात्रय पाटील रा.बोधे नगर, लातूर यास न्यायालयाने ६ महिने कारावास व रुपये २६ लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली!

त्यानंतर अमर जाधव–पाटील यांनी आरोपी ऋषिकेश पाटील ला नोटीस पाठवून धनादेशाची रक्कम आणून देण्यास सांगितले. परंतु, त्याने मुदतीत रक्कम आणून न दिल्याने अमर जाधव यांनी चलनक्षम दस्तऐवज कायद्याचे कलम १३८ नुसार ऋषिकेश पाटील याच्या विरोधात न्यायालयात रीतसर तक्रार दाखल केली. या प्रकरणात न्यायालयाने फिर्याद, साक्षी पुरावा, कागदपत्रे व फिर्यादीचा युक्तिवाद ग्राह्य धरून तसेच आरोपीने या प्रकरणात जाणीवपूर्वक केलेला विलंब लक्षात घेऊन त्या आधारे मा. प्रथमवर्ग न्यायाधीश श्रीमती जे. जे. माने यांनी आरोपीस सहा महिने कारावास व २६ लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. फिर्यादीचे वतीने ॲड. दीपक सोपानराव बनसुडे यांनी काम पहिले त्यांना ॲड. अभिषेक बुके, ॲड. बंडू बागमोडे,, ॲड. काकासाहेब गोडसे, ॲड. महेश वाघमारे, ॲड. चंद्रकांत सूर्यवंशी, ॲड. प्रणव नरहरे यांनी सहाय्य केले.

# पानगावच्या विठ्ठल मंदीर जिर्णोध्दाराचे ज्येष्ठ मंदीर स्थापत्य अभ्यासक डॉ. देगलुरकर, डॉ. जामखेडकर, डॉ. देव यांच्यासह अनेकांतून समाधान







लातूर :– पानगाव येथील प्राचिन विठ्ठल मंदीराच्या जतनासाठी तेथील गावकऱ्यांनी दिलेले योगदान, जिर्णोध्दार व विकास कामासाठी भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी शासनानाकडून आणलेला भरीव निधी, मंदिर समितीचा पुढाकार तसेच पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली होणारे मंदीराचे बांधकाम याबद्दल मूर्तीशास्त्र व मंदीर स्थापत्याच्या प्रख्यात अभ्यासकांनी समाधान व्यक्त केले असून गावकऱ्यांच्या धडपडीला शासनाने दिलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे या मंदीराचे गतवैभव अबाधीत राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. रेणापूर तालुक्यातील मौजे पानगाव येथे ११ व्या शतकातील विठ्ठल मंदीर आहे. मंदिरातील बाह्य भिंतीवर सुर सुंदरीची शिल्प व त्यावरील कलाकुसर लक्षवेधी आहे. उत्कृष्ट मंदीर स्थापत्याचा अविष्कार असलेल्या या ग्रामदैवत विठ्ठल मंदीर परिसरात अतिक्रम होते. तेथे घरे होती. ती काढावीत असे गावकऱ्यांना वाटले तथापि ते काढण्यापूर्वी तेथील घरांचे पुनर्वसन करावे ही बांधिलकी त्यांच्या मनात जागली. तथापि यासाठी मोठा पैसा लागणार होता. त्यामुळे मंदिर समितीने गावकऱ्यांची बैठक बोलवली व त्यात त्यांनी सारे काही कथन केले व गावकऱ्यांनी लोकवर्गणीतून हा प्रश्न मार्गी लावण्याचा संकल्प केला व त्याला यश लाभले. अतिक्रमण निघाले तरी मंदीर जिर्णोध्दारासाठी पैशाची गरज होती. ही अडचण भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांना समजली व त्यांनी सांस्कृतीक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे प्रस्ताव पाठवून याकामी पाठपुरावा सुरू केला. विशेष म्हणजे मंदिराभोवतीचे अतिक्रमण काढण्यासाठी गावकऱ्यांनी केलेले प्रयत्न व दिलेले योगदानही आ. कराड यांनी मंत्रीमोहदयांना सांगितले. मुनगंटीवारांनाही गावकऱ्यांच्या धडपडीबद्दल आस्था वाटली व त्यांनी आ. कराड यांच्या मागणीवर शिक्कामोर्तब करीत या मंदीर जिर्णोध्दारासाठी तब्बल ९ कोटी ३४ लाख रुपयांचा निधी नमो तीर्थस्थळ अंतर्गत मंजूर केला. जागतिक कीर्तीचे मंदिर स्थापत्य व मूर्तीविज्ञान अभ्यासक तथा डेक्कन कॉलेजचे माजी कुलपती गो. ब. देगलुरकर यांनी समाधान व्यक्त करुन गावकरी, आ. कराड सांस्कृतीक मंत्री मुनगंटीवार तसेच मंदिर समिती यांच्या प्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले मराठवाड्यातील मंदीरावर माझे प्रेम आहे. ही मंदीरे माझ्यासाठी सदैवच कुतूहल व अभ्यासाचा विषय आहेत. पानगावचे विठ्ठल मंदिर हे उत्कृष्ट मंदीरस्थापत्याचा अविष्कार आहे. माझ्या टेम्पल आर्किटेक्चर अँड स्कल्पचर ऑफ महाराष्ट्र या पुस्तकात मी पानगावच्या विठ्ठल मंदीर व तेथील मूर्तींबाबत विस्ताराने लिहले आहे. या मंदीराचा शासन र्जिणोध्दार करीत असल्याचे वाचून ऐकून मनाला मोठे समाधान वाटले. होणारे बांधकाम मंदिराशी सुसंगत व्हावे याबाबत काही मार्गदर्शन हवे असल्यास ते आपण आनंदाने करू असेही डॉ. देगलूरकर यांनी बोलून दाखविले.

महाराष्ट्र राज्याचे माजी राज्य पुरातत्व महासंचालक तथा डेक्कन कॉलेजचे कुलपती डॉ. अरविंद जामखेडकर यांनी गावकरी व लोकप्रतिनिधी यांच्या समन्वय व सहकार्यातून एखादे कार्य होत असेल तर त्याचा आनंद कोणालाही होईल. भाविकांच्या श्रध्देचा व अभ्यासकांच्या संशोधनाचा विषय ठरलेल्या पानगावच्या प्राचिन विठ्ठल मंदिराचा जिर्नोध्दार होतोय हे ऐकून आनंद झाला अशी भावना व्यक्त केली. हे मंदीर अप्रतिम वास्तूकलेच्या इतिहासाची साक्ष देणारे श्रध्दास्थान असून त्याचे जतन – संवर्धन व्हायलाच हवे व त्यासाठी पानगावकर, आ. रमेश कराड यांनी पुढाकार घेतला व शासनानेही त्यांच्या श्रध्दा व धडपडीचा आदर करीत भरीव निधी मंजूर केला याबद्दल मी या सर्वांचे अभिनंदन करतो. र्जिणोध्दार करीत असताना त्यात उणीवा राहू नयेत यासाठी या विषयातील तज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे, विशेषता डॉ. गो.ब. देगलुरकर, डेक्कन कॉलेज यासाठी योग्य राहतील असा सल्ला डॉ. यांनी दिला. दरम्यान ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, ज्येष्ठ मंदीर स्थापत्य अभ्यासक डॉ. प्रभाकर देव, महाराष्ट्र राज्य दर्शनिका विभागाचे माजी संपादक व सचिव डॉ. अरुणचंद्र पाठक यांनीही या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त करीत तज्ञाच्या मार्गदर्शनाखाली काम व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली पुरातत्व विभागाचे सहसंचालक अनिल गोटे यांनीही मुळ स्थापत्याला साजेशेच काम होईल असे सांगितले.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात डॉ. ए.पी. जे.अब्दुल कलाम जयंती निमित्त वाचन–प्रेरणा दिन विविध कार्यक्रमांनी साजरा.



केज/ प्रतिनिधी :– स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता केज जि बीड येथे दिनांक १५ आक्टोंबर २०२४ रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन – प्रेरणा दिन म्हणून ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथवाचन, कथाकथन, उत्स्फुर्त भाषण इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम घेवून संपन्न. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठसमाजसेवक, व्याख्यातेवसुदेव (बप्पा) गायकवाडहेहोते. ग्रंथप्रदर्शनातमाजीसरपंचरामराजेगायकवाड, सेवानिवृत्तग्रामसेवकएस. पी. गायकवाड, नानासाहेब जाधव, शंकर लवटे यांची उपस्थिती होती. ग्रंथ वाचन माजी उपसरपंच बालासाहेब गायकवाड, विठ्ठल भोग जकर, कमलाकर साबळे, सुंदर गायकवा, ओमकार घोगले, रोहन गायकवाड, संजय सोनवणे यांच्यासह बाल वाचकांनीही ग्रंथवाचन केले. कथाकथनर्वउत्स्फुर्तभाषणहीआनंदगायकवाड, दादासाहेबगायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, एस. के. वैरागे, बाळासाहेब गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुतसंच लन, आभार प्रदर्शन आनंद यांनी केले. तर अध्यक्षीय समारोप वसुदेव (बप्पा) गायकवाड यांनी केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE